2. **राष्ट्रीय कृषि विकास योजना**:

राज्य शासनाने शासन निर्णय क्र. राकृवि-2009/प्रक्र.323, पदुम-4, मुंबई-32 दिनांक 17 ऑक्टोबर 2012 अन्वये राष्ट्रीय कृषि विकास योजना (12 वी पंचवार्षीक) अंतर्गत पशुवैद्यक पदविधर/पदविकाधारक व इतर सुशिक्षीत बेरोजगारांमार्फत गायी/म्हशीमध्ये शेतकऱ्याच्या दारात कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करुन देणे ही योजना राबविण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. सदर योजनेअंतर्गत 2200 सेवादात्यांची कृत्रिम रेतन केंद्रे स्थापन करण्याचे उद्दिष्ठ होते त्यापैकी 1965 कृत्रिम रेतन केंद्रे स्थापन करण्यास मंजूरी प्राप्त झाली होती व प्रत्यक्षात 1543 कृत्रिम रेतन केंद्र कार्यान्वित करण्यात आली. सन 2013-14 पासून सेवादात्यांमार्फत करण्यात आलेली कृत्रिम रेतने व जन्मलेली वासरे याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **२०१३-१४** | **२०१४-१५** | **२०१५-१६** | **२०१६-१७** | **२०१७-१८** | **२०१८-१९ (माहे जुलै -१८ अखेर)** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | केलेली कृत्रिम रेतने | १८४५३६ | १७३७५४ | १६९६७८ | ६६५८४ | ६४०८१ | १७०८६ |
| **२** | जन्मलेली वासरे | १५९२९ | ३०६३२ | ३८९१४ | २१५६२ | २१३९२ | ५२०९ |
| **३** | मानधन वाटप (रु.लक्ष) | ६३.०९ | ९८.६७ | ८६.३५ | ९०.२० | ३१.०८ | १०.३५ **(माहे ऑगस्ट १८) २५८७ वासरांचे मानधन** |

सद्यस्थितीत राज्यामध्ये 248 सेवादात्यांची कृत्रिम रेतन केंद्रे कार्यान्वित असून त्याव्दारे कृत्रिम रेतनाचे कार्य चालु आहे.

शासन निर्णय क्र.संकिर्ण-2014 प्रक्र. 304 पदुम-4, मुंबई-32 दिनांक 27 एप्रिल 2015 अन्वये सदर योजना मे. जे.के. ट्रस्ट, ठाणे यांच्यामार्फत राबविण्यास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आली होती त्याअनुषंगाने राज्यामध्ये मे. जे.के. ट्रस्ट, ठाणे यांच्यामार्फत 1252 कृत्रिम रेतन केंद्रे कार्यान्वित करणे अपेक्षित होते त्यापैकी सद्या 1066 कृत्रिम रेतन केंद्रे स्थापन करण्यात आलेली होती.

मे. जे.के. ट्रस्ट, ठाणे यांचेमार्फत माहे जुन 2015 पासून जुन 2017 पर्यंत झालेले कार्य पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **सन २०१५-१६** | **सन २०१६-१७** | **सन २०१७-१८** | **सन २०१८-१९** | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केलेली कृत्रिम रेतने | २७०४३९ | २९५९८७ | ७५७०४ | ० | **६४२१३०** |
| २ | निर्माण झालेली वासरे | ० | २९१९७ | ३३६३९ | २६५०२ | **८९३३८** |
| ३ | अदा करण्यात आलेली रक्कम रुपये | ० | ५८४३१६०० | ६८१९०४०० | ५३८३१४०० | **१८०४५३४००** |
| ४. | रक्कम अदा करण्यात आलेली वासरांची संख्या | ० | २९१९७ | ३३६३९ | २६५०२ | **८९३३८** |

**प्राप्त निधी रु**. 6094.59 **लक्ष झालेला खर्च रु**. 5918.99 **लक्ष शिल्लक निधी रु**.175.60 **लक्ष**